गद्यपाठ ३- रयतेस स्वराज्य
ठळक मुद्दे

- **पाठाचे नाव :**रयतेस स्वराज्य–
- **लेखक-** राजर्षी शाहू महाराज,१८७४-१९२२
- **शाहू महाराजांचे व्यक्तीमत्त्व-** दूरगामी विचार करणारा, उदार, प्रजेचे कल्याण चिंतणारा राजा.
- **शाहू महाराजांचे रायतेविषयी असलेल्या भावना-** जनतेने राज्यकारभार हाती घ्यावा, जनतेने मराठी ३री इयत्ता तरी शिक्षण घ्यावे, रयतेत कर्तव्याची जाण निर्माण व्हावी.
- **प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता-** कर मिळवणे, देता येणे व योग्य तो खर्च करता येणे ह्यासाठी, राज्याची जबाबदारी घेण्यास पात्र होण्यासाठी, थोड्या लोकांच्या हाती सत्ता जाण्याचा धोका टाळण्यासाठी, स्वदेशी ब्युरोक्रसी रोखण्यासाठी, सत्तेची प्रजा-नोकरशाही-राजा व ब्रिटीश अशी विभागणी रोखण्यासाठी.
- **स्वराज्य-**रयतेने राज्यकारभार हाती घेणे, राजाला खर्चापुरती रक्कम देणे,नोकरशाही कडून लोकांकडे सत्ता जाणे.
- **भाषाशैली:** मनाला सहज भिडणारी, साधी सोपी, अलंकाररहित, थेट मुद्द्याला हात घालणारी.

**शाहूमहाराजांची भूमिका**

ह्या पाठात शाहू महाराजांनी आपल्या रयतेला म्हणजे कोल्हापूर संस्थानाच्या जनतेस उलेखून आपले मनोगत मांडले आहे. संस्थान खालसा झाल्यावर राजा आणि प्रजा असा संबंध राहणार नसून, ब्रिटीश सरकार हे रयतेचे सरकार असणार आणि जनता ब्रिटीश सरकारास जबाबदार राहणार.तेव्हा रयतेने जबाबदारी पेलताना कोणत्या गोष्टींची दखल घ्यायला हवी ह्याबद्दल शाहू महाराज सांगतात.

**प्रजेच्या सुखाची व उन्नतीची योजना-प्राथमिक शिक्षण**

शाहू महाराज हे सर्वसामान्य राजे नव्हते. राजाने प्रजेचा सांभाळ करणे ही प्रथा बंद करून रयतेने राज्यकारभार हाती घ्यावा आणि राजाला एक ठराविक रक्कम पेन्शन म्हणून द्यावी असा शाहू महाराजांचा विचार होता. राज्यकारभाराची कामे करण्यासाठी प्रजेने किमान पात्रता कमवावी असे त्यांचे म्हणणे होते.त्यासाठी शिक्षणाची सोय द्यायला हवी ह्याची जाणीव त्यांना होती. म्हणूनच प्राथमिक आणि उच्च शिक्षणाच्या प्रसाराची त्यांची खटपट होती. रयतेने किमान मराठी तिसरी इयत्ता शिकून तयार व्हावे आणि तसे झाल्यास ते आनंदाने राज्यकारभार प्रजेच्या हाती देतील असे त्यांचे स्वप्न होते.

**शिक्षण सर्वसामान्य जनतेला का द्यायचे?**

रायातेतील थोडाच भाग शिक्षित होणे शाहू महाराजांना योग्य वाटत नव्हते. कारण थोडाच भाग शिक्षित होऊन तो मोठ्या भागावर राज्य चालवणार असे चित्र त्यांना तयार करायचे नव्हते. याला ते 'स्वदेशी ब्युरोक्रसी' म्हणतात ज्यात अधिकार हे थोड्याथोडक्या लोकांकडे राहतात. तत्कालीन समाजातील (इंग्रज राजवटीत) अशा राज्यकारभाराचा धोका महाराजांना माहीत होता. ज्यात इंग्रज व येथील काही शिक्षित लोकांचाच सहभाग दिसत होता. अशा थोडक्याच लोकांकडे कारभाराची सूत्रे देण्याऐवजी सर्व जनतेला शिक्षण देऊन, त्यांची योग्यता वाढवून, त्यांच्या हाती सूत्रे द्यावीत ही त्यांची इच्छा होती.

महाराज ह्या पद्धतीला आर्यपद्धत म्हणतात, ज्यात मुलाने पित्याचा राज्यकारभार सांभाळायचा असतो. तसा ह्या ठिकाणी रयतच महाराजांचा पुत्र आहे अशी त्यांची भावना आपल्याला दिसून येते.

**तत्कालीन शासनपद्धती आणि प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता**

शाहू महाराजांची राजकीय दृष्टी अतिशय स्पष्ट आणि तत्कालीन परिस्थितीचा अचूक वेध घेणारी होती. भारतात एकीकडे नोकरशाही तयार होत होती. तर दुसरीकडे, इंग्रजी सुधारणा कायदा भारतीय मुलकात लोकशाही प्रस्थापित करू पहात होता. मात्र महाराजांची काळजी काय होती? तर ती लोकशाही मुठभर शिकलेल्या लोकांकडूनच नियंत्रित होईल. संस्थाने खालसा होण्याच्या म्हणजे संपण्याच्या वाटेवर असताना तेथील राज्यकारभार कसा असेल? तर राजा, ब्रिटीश सरकार आणि नोकरशाही यांच्यातच तो विभागलेला राहणार. म्हणजे पुन्हा एकदा राज्यकारभार लोकांच्या हाती येताना सत्ता झिरपत येणार. संस्थान खालसा झाल्यावर प्रजा जेव्हा ब्रिटीशसरकारला जबाबदार असेल तेव्हा जनता निर्णयप्रक्रियेत येऊ शकेल का? तोपर्यंत ती शिक्षित झाली नाही तर पुन्हा एकदा नियंत्रणाखाली येऊन आताची ब्युरोक्रसी जसे सांगेल तशीच वागणार नाही का? हे प्रश्न शाहू महाराजांसमोर आहेत. त्यामुळे आत्ताची शासनपद्धत शाहूमहाराज नाकारतात. म्हणूनच, जबाबदारी ओळखण्याची पात्रता रयतेत निर्माण व्हावी यासाठी प्राथमिक शिक्षणावर भर देतात. प्रजा शिक्षित झाली की तिला कर्तव्याची जाणीव होईल व त्यानंतर महाराजांना सर्व राज्यकारभार सोपवता येईल असे त्यांचे स्वप्न आहे.

**शाहूमहाराजांचे वेगळेपण**

भारतात ब्रिटीश सत्ता होती तेव्हा संस्थाने आणि संस्थानाबाहेरील प्रांत ह्या ठिकाणी राज्यसत्ता व प्रशासन वेगवेगळयाप्रकारे चालत असे. त्यातील फार थोडे संस्थानिक असे होते ज्यांना लोककल्याण व लोकहिताची चिंता होती. शाहू महाराज हे त्यातील एक होत. राजा असूनही राजासारखा विचार न करता समाजसुधारकासारखा त्यांनी विचार केला. नुसता विचार नाही तर त्यांच्या कारकिर्दीत तो आमलातही आणला. त्यांनी केलेल्या कामाविषयी जयसिंगराव पवार ह्यांनी लिहिलेली ही माहिती येथे वाचा-

http://www.rajarshishahusmarakkolhapur.com/shahumaharaj.html

सक्तीचे प्राथमिक शिक्षण लागू करणारा हा पहिलाच राजा होता. बहुजन समाज व वंचित समाजाला विविध सोयी उपलब्द्ध करून देऊन त्यांना शिक्षण कसे मिळेल ह्याची काळजी महाराजांनी घेतली. त्यांच्या लोकाभिमुख कार्यातूनच पुढच्या पिढीतही लोकशिक्षणाचे बीज रोवले गेले. कर्मवीर भाऊराव पाटीलांसारखी पुढची पिढीही त्यांच्या कार्याप्रमाणे उदार दृष्टीकोनाची तयार झाली.

**स्वाध्याय :**

**उजळणी प्रश्न**

पुढील प्रश्नांच्या आधारे धड्याचा विचार करा व ३० ते ४० शब्दांत उतरे द्या.

१) रयतेने प्राथमिक शिक्षण घेणे शाहू महाराजांना का महत्त्वाचे वाटते?
२) स्वदेशी ब्युरोक्रसी महाराज कशाला म्हणतात व त्यातील धोके काय आहेत?

पुढील प्रश्नाच्या आधारे धड्याचा विचार करा व ५० ते ६० शब्दांत उत्तरे द्या.

१) शाहू महाराजांना आर्यपद्धती का योग्य वाटते?
२) प्रजा, नोकरशाही, राजा व ब्रिटीश गव्हर्नमेंट अशी सत्तेची विभागणी काय अडचणी निर्माण करतील असे महाराजांना वाटते?
३) प्राथमिक शिक्षणाने कोणती योग्यता अथवा पात्रता लोकांमध्ये निर्माण होईल?

संदर्भासहित स्पष्टीकरण द्या:

१) 'पुढे कर देणे व योग्य तो खर्च करणे ही जबाबदारी रयतेवर पडेल'
२) 'गाड्याची दोन्ही चाके मजबूत पाहिजेत....तसेच गाड्याचे जूसुद्धा मजबूत पाहिजेत'

**<u>मुक्त प्रश्न</u>**

१) रयतेस स्वराज्य ह्या पाठातून शाहू महाराजांचा वेगळेपणा कसा पुढे येतो?
२) शाहू महाराजांनी कोणकोणत्या प्रकारचे कार्य केले हे सोबतच्या पूरक माहितीच्या आधारे शोधा व सारांशाने लिहा. http://www.rajarshishahusmarakkolhapur.com/shahumaharaj.html
३) समाजात असेही काही लोक आहेत ज्यांना शिक्षण घेणे किंवा देणे महत्त्वाचे वाटत नाही. अशा लोकांना तुम्ही काय संदेश द्याल?